# सुयश वधू-वर सूचक मंडळ

१४९५, सदाशिव पेठ, 'साहित्य सम्राट' अपार्टमेंटस्, 'सी' विंग, पुणे
-३०. (०२०)२४४८२४७६.


## साईट पाहताना :

सुयश वधू-वर मंडळाच्या साईट वर आपले सहर्ष स्वागत...

- *सुरक्षेच्या कारणांकरीता 'इंटरनेट' वर वधू - वरांची सर्व माहिती (फोटो, नांव, पत्ता, मोबाईल, फोन नंबर तसेच **email ID** या गोष्टी वगळून ) दिलेली आहे. नांव, पत्ता, मोबाईल, फोन नंबर तसेच **email ID** या माहितीसाठी फक्त 'इंटरनेट सभासदत्व' असलेल्या सभासदांना संस्थेकडे संपर्क साधून आपल्या* **email ID** *वरही ही माहिती उपलब्ध करुन घेता येईल. अर्थात त्यासाठी संस्थेकडून दिलेला आपल्या 'इंटरनेट सभासदत्वा' च्या कोड नंबरचा संदर्भ संस्थेला देणे आवश्यक आहे.ही माहिती फोनवरुन देखिल उपलब्ध होऊ शकते.*

**web site : www.suyashvadhuvar.com      email ID : suyashvadhuvar@gmail.com**

साईट पाहताना खालील गोष्टी ध्यानात घ्याव्यात :

वरच्या बाजूस लाल रंगाच्या पट्टीमध्ये स्थळांची यादी, काही विशेष स्थळे, नावनोंदणी, विवाहविषयक लेख व आमच्या शाखा व संपर्क/चौकशी असे सहा ऑप्शन्स मिळतील.

स्थळांची यादी पाहण्यासाठी 'स्थळांची यादी' या ऑप्शनवर क्लिक करावे. यामध्ये ..........

१) सर्वात वरच्या बाजूस असलेल्या वधु / वर (**Any** ) या बटनवर क्लिक करून वधु किंवा वर यापैकी आपल्याला हवा असलेला
**'option' Select** करुन क्लीक करावा.

२) ' वैवाहीक स्थिती ' यामध्ये पाच **options** दिलेले आहेत. पैकी आपल्याला हवा असणारा **'option' select** करावा.

३) त्यानंतर ' वय' हा **option** दिलेला आहे. यापैकी दोन चौकोनात आपल्याला आवश्यक अशी / योग्य वाटणारी वये टाईप करावीत म्हणजे अपेक्षित वर किंवा वधू त्या वयांमधील / वयोगटातील दिसतील.

४) जात व पोटजात यामधील आपल्याला हवे ते **options click** करावेत म्हणजे स्क्रीनवर दिसणारे वर किंवा वधू आपण **click**
केलेल्या पोटजातीतीलच दिसतील.

५) आपल्याला किती उंचीपासून किती उंचीपर्यंतचा वर / वधू अपेक्षित आहे. त्या उंचीचे सर्व आकडे **select** करावेत. हे आकडे
**select** करताना **Key Board** वरील (**Shift** ) व (डाऊन ॲरो) या बटणांचा वापर करावा.

६) शिक्षणाच्या संदर्भात दिलेले **options select** केले असता त्या त्या शिक्षणाचेच वर/वधू आपणास स्क्रीनवर पहावयास

मिळतील. एका वेळी एकापेक्षा जास्त **options select** करताना **Key Board** वरील (**Shift**) व (डाऊन ॲरो) या बटणांचा
वापर करावा.

७) वराची /वधूची अपेक्षित मासिक प्राप्ति ( किमान व कमाल) त्यानंतरच्या चौकोनांत टाकल्यास अपेक्षित मासिक प्राप्ति असणाऱ्या
वधू/वरांची स्थळे आपणांस पाहता येतील.

* प्रत्येक **selection** केल्यावर किंवा सर्व **options** चे **selection** केल्यावर (**Apply**) हे बटण **click** करावे म्हणजे आपल्याला काही वेळात आपण दिलेल्या अपेक्षांनुसार आपणास आमचे येथे असलेली सर्व स्थळे स्क्रीनवर पहावयास मिळतील.

(कृपया मागील पानावर पहा.)

ज्या स्थळाची माहिती आपल्याला सर्वार्थाने योग्य व अनुरुप वाटत असेल त्या स्थळाच्या '**F**' नं. किंवा '**M**' नंबरवर **Single Click** केल्यावर त्या त्या स्थळाची आमच्याकडे दिलेली जादा माहितीही आपणांस उपलब्ध होईल.उदा.कौटुंबिक माहिती, जन्मतारीख, जन्मठिकाण, जन्मवेळ वगैरे.

आपणास हवा असलेला वराचा किंवा वधूचा अनुक्रमांक 'सभासद अनुक्रमांक' या चौकोनात टाईप करून '**Apply**'हे बटण क्लिक केल्यावर फक्त **click** केलेल्याच वराची किंवा वधूची माहिती आपल्याला स्क्रीनवर दिसू शकेल.

त्यानंतर काही विशेष स्थळे असे शिर्षक दिसेल. त्यावर क्लीक केल्यास त्या अंतर्गत . . . . . . . . . .

<u>परदेशातील स्थळे</u> - यावर क्लीक केले असता आपल्याला परदेशातील स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकेल. (हयामध्ये वयानुसार स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे.)

<u>मुंबईकडील वरांची स्थळे</u> - यावर क्लीक केले असता आपल्याला मुंबईकडील व आसपासची वरांची स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध होऊ
शकेल. (हयामध्ये देखिल वयानुसार स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे.)

<u>मुंबईकडील वधूंची स्थळे</u> - यावर क्लीक केले असता आपल्याला मुंबईकडील व आसपासची वधूंची स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध होऊ
शकेल. (हयामध्ये देखिल वयानुसार स्थळे पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे.)

<u>अल्पशिक्षित वधूंची स्थळे</u> - यावर क्लीक केले असता आपल्याला अल्पशिक्षित वधूंची स्थळे पाहता येतील.

<u>व्यंगाची स्थळे</u> - यावर क्लीक केले असता आपल्याला व्यंग असलेल्या सर्व (वरांची व वधूंची )स्थळे पाहता येतील.

- <u>(वरील स्थळे एकूण स्थळांमधूनच वेगळी घेतलेली असल्याने काही विशेष स्थळे पाहतांना स्थळांची द्विरुक्ती (**Duplication**) होऊ शकते.)</u>

- <u>कोणत्याही स्थळाची/स्थळांची कसलीही माहिती हवी असल्यास '**सुयश**' वधू-वर संस्थेची मेंबरशीप असणे आवश्यक व अनिवार्य आहे.</u>

✔ आपल्याला योग्य वाटणाऱ्या स्थळांचे अनुक्रमांक व नोंदणी क्रमांक, असे एकाखाली एक लिहून ठेवा. संस्थेकडून त्या त्या स्थळांची

माहिती घेतांना या दोनही नंबर्सचा संदर्भ द्यावा लागेल. मात्र तत्पूर्वी स्वतःचे नांव व स्वतःचा नोंदणी क्रमांक संस्थेला कळविणे आवश्यक आहे.

संस्थेमध्ये नांव नोंदविण्यासाठी ‘ नावनोंदणी ’ या **option** वर क्लीक केल्यास संस्थेचे नियम व अटी आपणांस पाहावयास मिळतील. तसेच त्याच **option** वर संस्थेचा नांव नोंदणीचा फॉर्मही ( **Membership Form** )आपणास उपलब्ध होऊ शकेल. त्याची प्रिंट काढून तो भरुन व सही करुन पाठवावा. फॉर्म हा पूर्णपणे भरलेला असावा. अपेक्षा **Specific** असाव्यात. फॉर्म बरोबर फोटो पाठविणे आवश्यक आहे. नोंदणीशुल्क हे मनिऑर्डर किंवा डी.डी. नेच स्विकारले जाईल. चेक पाठवू नये. अपुऱ्या भरलेल्या फॉर्मद्वारे नोंद केली जाणार नाही.

संस्थेच्या शाखा - ‘ आमच्या शाखा ’ यांवर आपण क्लीक केल्यास आमच्या सर्व शाखा, त्यांचे पत्ते व फोन/मोबाईल नंबर्स आपणांस उपलब्ध होतील. आपल्याला जवळ किंवा सोयिस्कर असणाऱ्या शाखेशी संपर्क साधून आपण आमचे नियम व अटी तसेच संस्थेविषयीची माहिती जाणून घेऊन वराची /वधूची नोंदणी करु शकता.

ॐॐॐ